# श्रध्दांजली - दिलीप चित्रे

या देवानो या ताऱ्यानो
गंध फुलानो या वाऱ्यानो
जवळ दूरच्या या साऱ्यानो
आज आमुच्या घरट्यालाहि
मानावे निजधाम
आमुचा घ्यावा नम्र प्रणाम

सन १९८७च्या आधीवेशानाचं स्वागत गीत. लिहिलं होतं दिलीप चित्रे यांनी. BMMचं रोपटं नुकतच रुजायला लागलं होतं. आमची पहिली पिढी अजून स्थिर होण्याची धडपड करत होती. दुसरी पिढी अजून रांगत होती, अडखळत पावलं टाकायला शिकत होती,कुणी A B C D ची धुळाक्षरं गिरवायला लागली होती. त्यांना babysitterकडे, बालावाडीमधे, शाळेत सोडून आई बाबा जड पावलांनी कामाला जात होते. त्यांना सांभाळणारे आजी आजोबा अजून पोचले नव्हते अमेरिकेत. पण या नव्या देशात स्थिर व्हायचं, प्रगती करायची,मायदेशाची कीर्ती दिगंत करायची आणि पुढच्या पिढीला नवीनवी क्षितीजं मिळवून देताना आमच्या भाषेचा, आमच्या संस्कृतीचा वैभवपूर्ण वारसा त्यांच्या हाती सुपूर्त करायचा हे स्वप्न उराशी धरून धडपडत मित्रामैत्रीनणीन्च्या आधारानं एकमेकांना साथ देत इथपर्यंत पोचलो. खूप उंची गाठली पण आकाश अजून लांब आहे. नव्या पिढीची भरारी त्या दिशेकडे आहे.त्यांच्या यशानं स्तिमित असलेली आमची पिढी अभिमानानं त्यांच्या पाठीशी आहे. दाराशी उभं आहे १७वं अधिवेशन. गुढ्या तोरणं लागलीयत. सभागृह सजलंय,रंगमंच सिद्ध आहे.पहिली घंटा वाजलीय,धूपाचा गंध दरवळायला लागलाय आणि या दूरदेशी रुजलेल्या तीन पिढ्या हजारो पाहुण्यांच्या .... छे छे आमच्या सख्या सोयाऱ्यानच्या,जिवलग मित्रांच्या आणि सुहृदांच्या स्वागताला अधीर मनानं सिद्ध आहेत. आणि स्वागताचे सूर पुन्हा' दिलीप चित्र्यांचेच शब्द घेऊन सजले आहेत

बीज पेरिले प्रथम पिढीने
वृक्ष जाहले'त्यांचे
त्या वृक्षांना फळे लगडली
भाग्य अमुचे तुमचे
स्वागतास सर्वांच्या जमलो

मैत्र पिढ्यांचे जेथे ......

बरोब्बर दोन वर्षांपूर्वीची पोस्ट . लॉस अँजेलिसचं बृहन्न महाराष्ट्र अधिवेशन अगदी जवळ आलं होतं आणि अचानक स्वागतगीत सादर करायची कामगिरी गोपाळवर सोपवली गेली. गाणं लिहिण्यापासून तयारी. दिवस अगदी थोडे. मग आठवण आली आमच्या हुकमी एक्क्याची. रात्री ११. ३०वाजता ई मेल पाठवली आणि सकाळी ६ वाजता कविता तयार होऊन उत्तर आलं. .." बीज पेरिले प्रथम पिढीने "..... सिद्धहस्त कवि, अर्थात आमचे जुने मित्र दिलीप चित्रे, स्वतः लिहिलेलं हे गीत अमेरिकेतल्या ३ पिढ्यांच्या तोंडून ऐकायला २०१५च्या अधिवेशनात स्वागत समारंभाला हजर होते. आता पुन्हा पुढचं अधिवेशन दारात उभं आहे पण सभागृहात स्वागतगीत ऐकायला पांढऱ्याशुभ्र दाढीचा आणि मिस्कील चेहेऱ्याचा आमचा मित्र तिथे असणार नाही. खूप आठवणी आहेत त्यांच्या, गेल्या ४५ वर्षात जमवलेल्या, नेहमीच आनंद देणाऱ्या आणि चेहेऱ्यावर हास्य आणणाऱ्या . अशीच एक आठवण .. नवीन होतो आम्ही सगळेच या देशात. न्यू जर्सीमध्ये छान ग्रुप जमला होता सतत काहीतरी नवीन करायची धडपड चालू असायची. मग एक गाण्याची रेकॉर्ड काढायचं ठरलं. कवी अर्थातच उत्साहमूर्ती दिलीप चित्रे, तेव्हा वॉशिंग्टनला स्थायिक झालेले आणि संगीतकार गोपाळ मराठे. गायक गोपाळ आणि लॉस एंजेलिसची शोभा आंबेगावकर. सगळी तयारी झाली. रेकॉर्डिंगचा दिवस ठरला वाद्यं आणि हौशी वादक जमले, स्टुडिओमध्ये ५ /६ गाण्यांचं रेकॉर्डिंग झालं पण ऐन वेळी एक गाणं कमी पडलं. रात्री दिलीपना फोन केला.. त्यांच्या दोनचार शेलक्या गोड शिव्या ऐकल्या, पण पहाटे ६ वाजता फोन वाजला. मीच अर्धवट झोपेत तो उचलला, आणि चित्र्यांचा आवाज कानावर पडला " मी सांगतोय ते शब्द लिहून घे " अशी आज्ञाच होती त्यानी सांगायला आणि मी लिहायला सुरवात केली

माझ्याच कातडीचे जोडे शिवून आलो
मी फाटका परंतू आभाळरूप झालो !!

व्रण झेलता उराशी अश्राप सावल्यांचे
जळती कितीक डोळे बेमान माणसांचे
वणव्यातूनी सुखाचा रथ घेउनी निघालो !!

पोळून धान्य झाले हे पाय चालण्याने
घामेजल्या स्वरांचे उरले उरात गाणे
अंधारल्या दिशांना पंखाविना उडालो !!

मी फटका परंतु आभाळरूप झालो

शोभा, रोहित.अमित... किरकोळ शरीरयष्टी होती पण दिलीप सतत सुखाच्या रथातून सुख वाटीत असायचे आणि आभाळरूपच होते ते नेहमीच आणि आभाळासारखेच आपल्या बरोबर असतील अवती भोवती आठवणीतून.

**- नंदा मराठे**